| | | | |
|---|---|---|---|
| ४) | महात्मा गांधी मिशनचे कॉलेज ऑफ इंजि.कामोठे,नवी मुंबई | १) सिव्हिल इंजि.<br>२) इन्फारमेशन टेक्नॉलॉजी | ४० वरुन ६०<br>३० वरुन ४० |

२. हीं मान्यता खालील अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.:-

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) वरील अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणा संबंधित संस्थेने संबंधित विद्यापीठाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार शासनाने सन १९९३-९४ मध्ये विहित केलेल्या नियमानुसार संबंधित संस्थेतील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रवेश संचालक,तंत्रशिक्षण यांच्यामार्फत करण्यात येतील.

३. याबाबत आवश्यक त्या औपचारिक बाबींची पूर्तता करण्यासाठी संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ यांच्याशी त्वरित संपर्क साधावा. संचालक, तंत्रशिक्षण यांनी याबाबत आवश्यक त्या नोंदी अभ्यासक्रम विषयक नोंद वहीत ठेवाव्यात

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( श्या. र. चौरे )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई /नाशिक /पुणे /नागपूर

कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई

कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव

कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर

संबंधित संस्थेस-

प्रत, माहितीसाठी-

१) अतिरिक्त सचिव, (तांत्रिक) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली-११०००२

२) सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण विभाग) पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल अॅश्युरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यात सुरु असलेल्या अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/ एमसीए /पीजीडीएम महाविद्यालयातील नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ व घट करण्यास शासन मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. टीईएम-२०१२/प्र.क्र.९८(भाग-१)/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३० जून, २०१२

संदर्भ :
१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने संचालक, तंत्रशिक्षण, म.रा., मुंबई यांना दि.१४.०६.२०१२ रोजी तसेच दि.२६.०६.२०१२ रोजी आणि २८.०६.२०१२ रोजी पाठविलेले ई-मेल संदेश.
२) संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य , मुंबई यांनी शासनास सादर केलेले पत्र क्र.२/एनजीसी/अभ्यासक्रम व प्रवेशक्षमताबदल/मान्यता/२०१२/६८९, दिनांक २०.०६.२०१२
३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या क्र.२/एनजीसी/अभ्यासक्रम व प्रवेशक्षमताबदल/मान्यता/२०१२/७३७, दिनांक ३०.०६.२०१२

**शासन निर्णय :** शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने राज्यात सुरु असलेल्या खाजगी विना अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/ एमबीए/ एमएमएस/ एमसीए/ पीजीडीएम महाविद्यालयातील नवीन पदवी/पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास तसेच प्रवेशक्षमतेत वाढ व घट करण्यास सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ प्रमाणे मान्यता दिलेली आहे. सदर माहिती संचालक, तंत्रशिक्षण यांनी शासनास त्यांच्या दिनांक ३० जून, २०१२ च्या पत्रान्वये सादर केलेली आहे. त्यास अनुसरुन शासन निर्णय निर्गमीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने दिलेली मान्यता विचारात घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यास व अतिरिक्त नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास शैक्षणिक वर्ष २०१२-१३ पासून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.
२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक (तंत्रशिक्षण) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या सलग्नीकरणास संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता/सलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक (तंत्रशिक्षण) यांचेकडे आवश्यक ती संचित ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदवी व पदव्युतर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार/पद्धतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट, १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कॉन्सिल ऑफ ईडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

८) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ याची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

९) याशिवाय संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

१०) दुसऱ्या पाळीसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली महाराष्ट्र शासन व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विहित केलेल्या /करावयाच्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

(भ. सं.वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, (संचालकामार्फत)
सर्व विद्यापीठांचे कुलसचिव, (संचालकांमार्फत)
सर्व संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

<u>प्रत माहितीसाठी सादर</u> -

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, ७ वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली- ११० ००१.

सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरंस बिल्डींग, २ रा मजला, चर्चगेट, मुंबई.

DTE, Mumbai

Variation in Intake for academic year 2012 as per AICTE communication on 14, 26 28 Jun 2012 [Under Graduate Course Post Graduate Courses]

| Inst Code | Name of the Institute | Course Type Name | Course Type Details | CourseName | Course Start Year | 2011-2012 | 2012-2013 | Diff |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3148 | Mahavir Education Trust's Shah & Anchor Kutchhi Engineering College, Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Electronics and Telecommunication Engg | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3148 | Mahavir Education Trust's Shah & Anchor Kutchhi Engineering College, Mumbai | Bachelor of Engineering (Direct Second Year) | Regular First Shift | Computer Engineering | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3150 | Taheri Scholarship Society Institute of Management Studies & Research, Mumbai | Post Graduate Diploma | Part Time First Shift | Post graduate Certificate in Management | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3150 | Taheri Scholarship Society Institute of Management Studies & Research, Mumbai | Post Graduate Diploma | Part Time First Shift | Post Graduate Diploma In Management(Healthcare & Hospital) | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3154 | Saraswati Education Society's Saraswati College of Engineering,Kharghar Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Mechanical Engineering | 2004 | 90 | 120 | 30 |
| 3154 | Saraswati Education Society's Saraswati College of Engineering,Kharghar Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular Second Shift | Mechanical Engineering | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3155 | Yashwantrao Chavan Shikshan Prasarak Mandal's Sinhgad Institute of Business Management, Chandivali | M.B.A./M.M.S. | Regular First Shift | M. M. S. | 2009 | 180 | 300 | 120 |
| 3156 | Dilkap Research Centre & Institute of Management Studies,Mamdapur,Neral,Near Karjat | M.B.A./M.M.S. | Regular First Shift | M. B. A. | 2009 | 120 | 60 | -60 |
| 3157 | Shree Ghatkopar Sarvajanik Jivdaya Khatur's Aruna Manharlal Shah Institute of Management & Research, Ghatkopar | P.G.D.M. | Regular First Shift | Executive | 2010 | 60 | 0 | -60 |
| 3160 | Mahatma Edu.Soc.'s Pillai's HOC Institute of Management studies & research, Raigad | M.B.A./M.M.S. | Regular First Shift | M. M. S. | 2009 | 120 | 180 | 60 |
| 3160 | Mahatma Edu.Soc.'s Pillai's HOC Institute of Management studies & research, Raigad | P.G.D.M. | Regular First Shift | Executive | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3167 | Mumbai Education Trust's Institute of Computer Science, Bandra (W), Mumbai | P.G.D.M. | Regular First Shift | E-Business | 2012 | 0 | 120 | 120 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Master of Engineering (M. E.) | Regular First Shift | Information Technology | 2012 | 0 | 18 | 18 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Master of Engineering (M. E.) | Regular First Shift | Instrumentation Engineering | 2012 | 0 | 18 | 18 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Information Technology | 1999 | 60 | 120 | 60 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Instrumentation Engineering | 1998 | 60 | 120 | 60 |
| 3174 | Ramrao Adik Edu Soc, Ramarao Adik Instt. of Tech., Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular Second Shift | Electronics and Telecommunication Engg | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3175 | M.G.M.'s College of Engineering and Technology, Kamothe, Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Computer Engineering | 1986 | 90 | 120 | 30 |
| 3175 | M.G.M.'s College of Engineering and Technology, Kamothe, Navi Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Information Technology | 2001 | 40 | 60 | 20 |
| 3176 | Thakur College of Engineering and Technology, Kandivali, Mumbai | Bachelor of Engineering (B. E.) | Regular First Shift | Mechanical Engineering | 2012 | 0 | 120 | 120 |
| 3185 | Vivekanand Education Society's Institute of Technology, Chembur, Mumbai | Master in Computer Application (M.C.A.) | Regular First Shift | Master in Computer Application | 2012 | 0 | 60 | 60 |
| 3185 | Vivekanand Education Society's Institute of Technology, Chembur, Mumbai | Master in Computer Application (M.C.A.) | Regular Second Shift | Master in Computer Application | 2012 | 0 | 60 | 60 |

शैक्षणिक वर्ष-२००१-२००२ पासून अभियांत्रिकी
पदवी अभ्यासक्रमाच्या विस्तारास मंजूरी --
प्रवेशक्षमता वाढ/कमी व अतिरिक्त नवीन अभ्यासक्रम

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय,क्रमांक पीईसी २००१/(४०९ /०१)तांशि.१**
**मंत्रालय,विस्तार भवन, मुंबई-३२**
**दिनांक :- ५ मार्च, २००२**

**संदर्भ:-** १) शासन निर्णय,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.टीईएम-२००१/(३४०/०१)तांशि-१

२) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची

१) क्रमांक एफ ७४०-८९- २६५ (ई)/आरसी/९४, दिनांक १३ जुलै..२००१
२) क्रमांक एफ ७४०-८९- ३३१ (ई)/ ईटी/९९, दिनांक १३ जुलै..२००१
३) एफ ७४०-८९- २६० (ई)/आरसी/९४, दिनांक २० जुलै..२००१
४) एफ ७४०-८९- २३१ (ई)/आरसी/९४, दिनांक ३० ऑगस्ट.२००१

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन दिनांक १३ जुलै २००१, २०जुलै,२००१, व ३० ऑगस्ट,२००१ च्या ४ पत्रांवये सन २००१-२००२ मध्ये राज्यातील ४ खाजगी संस्थांच्या अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या विस्तारास मान्यता देताना सदरहू ४ खाजगी संस्थांना नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी व संस्थेतील पदवी अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता वाढ/घट करण्यासाठी मान्यता दिली आहे. या मान्यतेस अनुसरुन संबंधित ४ खाजगी संस्थांच्या वाढीव अभ्यासक्रमाना मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती

२. सन २००१-२००२ साठी प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमातील तरतूदीनुसार प्रवेश प्रक्रियेसंबंधीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेत कोणत्याही नवीन संस्थेचा/अभ्यासक्रमाचा किंवा प्रवेशक्षमता वाढ/घट चा समावेश करता येणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे. व यावर्षीची प्रवेश अधिसूचना यापूर्वीच दिनांक १४.७.२००१ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. यास्तव आता या शासन निर्णयान्वये खालील ४ संस्थांना सन २००१-२००२ पासुन त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नवीन पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी व संस्थेतील पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत वाढ/घट करण्यासाठी मान्यता देण्यात येत आहे.या मान्यतेप्रमाणे सदर अभ्यासक्रमासाठीचे : : मात्र प्रवेश सन २००२-२००३ पासुन करण्यात यावेत.:-

| अ.क्र | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | श्रम साधना ट्रस्टचे कॉलेज ऑफ इंजि. ॲन्ड टेक्नॉलॉजी .बांभोरी. जळगांव | १) इलेक्ट्रीकल इंजि.<br>२) इलेक्ट्रॉनिक्स ॲन्ड टेलिकम्युनिकेशन इंजि. | ६० वरुन ३०<br>६० वरुन ९० |
| २) | सम्यक शिक्षण संस्थेचे श्रीमती राधिकाताई पांडव कॉलेज ऑफ इंजि. दिघोरी नाका जवळ,उमरेड रोड,नागपूर | १) इन्फारमेशन टेक्नॉलॉजी | ० वरुन ६० |
| ३) | सरदार पटेल मेमोरिअल सोसायटीचे चंद्रपूर इंजि. कॉलेज, बाबूपेठ,चंद्रपूर | १) इन्फारमेशन टेक्नॉलॉजी | ० वरुन ४० |

COLLEGE OF ENGG. & TECHNOLOGY
Inward No.: 857
Date: 30/3/02

Adm
20/3/02